**नि.फौ.ख.क्रं. ९९/२०१५** **निशाणी क्र. १६**
**शासन .वि. सचिन साहु व इतर**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०१ ची शपथेवर जबानी

.......

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | – | समिर बबनराव कटकमवार |
| **वय** | – | ४१ वर्षे, धंदा – व्यापार, |
| **राहणार** | – | पोंर्भुना, तालुका–पोंर्भुना, जि. चंद्रपूर. |

.......

**सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.व्ही.डोरले यांच्यामार्फत**

१. दि.०७/०९/२०१५ ते ०९/०९/२०१५ रोजी कांढळी रोडजवळ जी.टी.एल.कंपनीचे टॉवरजवळ सदरची घटना घडली. त्यावेळी मी डी.पी.एल कंपनीमध्ये सुपरवाईजर पदावर कार्यरत होतो. मला जी.टी.एल. कंपनीच्या टेक्नीशीयनचा फोन आला की, टॉवर बंद पडलेला आहे. त्यावेळी आम्ही टॉवर वर पोहोचलो. तेथे आम्हाला टॉवरची २४ बॅट–या व एक जनरेटर बॅटरी चोरी गेल्याची दिसली. त्यामुळे टॉवरची पॉवर गेली होती. त्यामुळे कंपनीचे रु. ७२,०००/– चे नुकसान झाले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन येथे जाउन तक्रार दाखल केली. आता मला मी दिलेली तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१७** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१८** देण्यात येते. त्यानंतर मला दोन दिवसांनी पोलीसांचा फोन आला व चोर व बॅट–या मिळाल्याचे सांगितले. त्यानंतर मी, संतोष चव्हाण व एक इसम पोलीस स्टेशनला गेलो. तेथे आम्ही त्या बॅट–या ओळखल्या. तसेच पोलीसांनी आम्हाला ज्या आरोपींकडुन त्या बॅट–या हस्तगत केले, ते आरोपी दाखविले. आज रोजी त्यातील दोन आरोपी न्यायालयात हजर आहे व एक गैरहजर आहे. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. चोरी गेलेल्या बॅट–या आम्हाला मिळाल्या.

**सरतपास संपला**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ आर.एस.लिल्हारे यांच्या मार्फत :</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेची तारीख निश्चीत सांगु शकत नाही. मी कोणत्या कंपनीमध्ये कामाला होतो हे घाइमध्ये पोलीसांना सांगितले नसु शकते. ज्या दिवशी बॅट–या आम्हाला प्राप्त झाल्या, त्यादिवशी पोलीसांनी आमचे बयान नोंदविले. हे म्हणणे खरे आहे की, बॅट–या ज्यावेळी चोरीला गेल्या त्यावेळी आरोपी कोण होते याबाबत आम्हाला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेमध्ये चोरी गेलेल्या बॅट–या कोणाच्याही घरामध्ये सहजरित्या उपलब्ध होउ शकतात. मी ज्या कंपनीमध्ये कामाला आहे त्या कंपनीचे कोणतेही कागदपत्र पोलीसांनी माझ्या कडुन हस्तगत केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेतील बॅट–या आमच्या कंपनीच्या कर्मचा–यांनी गहाळ केल्या होत्या त्यांना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी तक्रार व माझे बयान कोर्टाबाहेर वाचले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आरोपींना मला कधी ही दाखविले नाही व मी आरोपींना कधी ही पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरील घटनेशी आज रोजी न्यायालयात हजर असलेल्या आरोपींच्या काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कंपनीच्या कर्मचा–यांना वाचविण्यासाठी खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला</u>**.

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.02.03 16:23:14 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**<u>दिनांक</u>** : ०३/०२/२०२६